Historicity Research Journal **Impact Factor : 1.4152 (UIF)**
ISSN : 2393-8900 **Volume - 3 | Issue - 1 | September - 2016**

प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असा कायदा करणारे डॉ. पंजाबराव देशमुख

डॉ. प्रशांत प्र. कोठे
इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आकोट, जि. अकोला .

प्रस्तावना

ब्रिटिशांनी भारतीयांना इंग्रजी भाषेत शिक्षण देण्याची सुरवात केली ते भारतीयांबध्ददल असणाऱ्या प्रेमातून नव्हे तर प्रशासकीय गरज या उद्देशाने सुरवात केली. त्यातुनच भारतात बंगाल, कलकत्ता, मद्रास, बनारस इ. ठिकाणी विद्यालये स्थापन झाली. इ.स. १८१३ च्या चार्टर ॲक्ट नुसार कंपनीने भारतीयांच्या धर्मप्रसाराच्या उद्देशाने इंग्रजी भाषेत शिक्षणासाठी विविध ठिकाणी निःशुल्क शाळा उघडल्या. इ.स.१७९३ मध्ये कलकत्या जवळ असलेल्या श्रीरामपूर येथे मिशनऱ्यांनी इंग्रजी शाळा उघडल्या.[१] इं. स. १८३५ मध्ये बेंटींगच्या काळात राजा राममोहन राय च्या आग्रहापे मेकॉलेच्या अहवाला नुसार भारतीयांना इंग्रजी भाषेतुन शिक्षण देण्याचा निर्णय झाला. त्या मागे पाश्चात्य संस्कृतीचा परिचय भारतीयांना होईल हाही एक उद्देश होता. परंतु त्या नंतरच्या काळात शिक्षणा कडे विशेष लक्ष दिले गेले नाही. लॉर्ड डलहौसरने मात्र विशेष लक्ष देऊन सर चार्लस वुड च्या नेतृत्वा खाली कमीशन नेमले. त्याने सादर केलेल्या अहवाला नुसार शिक्षण क्षेत्रात महत्वाची पावले उचली त्यामुळे अनेक विचारवंत डलहौसीला आधुनिक शिक्षण प्रणालीचा जनक मानतात.[२] त्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात प्रगती होत गेली. त्यामुळे भारतात पुरोगामी विचारांची सुरवात झाली. संपूर्ण देशाचा विचार करीत असतांना महाराष्ट्रही अशा पुरोगामी विचाराचा पुरस्कर्ता राहीला आहे.

आधुनिक कालखंडात महाराष्ट्रात प्रबोधनाच्या क्षेत्रात फार मोठया प्रमाणावर कार्य झाले. आधुनिक महाराष्ट्राच्या जडनघडनीत शिक्षणाच्या विकासाची भुमिका महत्वाची राहीली आहे. समाजाच्या तळातील बुध्दीमान स्तरातुन महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी संपूर्ण देशात शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतीकारक कार्य केले. नंतरच्या काळात ज्या लोकांनी हे शिक्षण विकासाचे कार्य पुढे नेण्याचे कार्य केले त्या मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव आग्रहाने घ्यावे लागते. त्यांनी समाज परिवर्तन घडून आणायचे असेल तर तळागळातील कष्ट करणाऱ्या समाजातच शिक्षणाची व्यवस्था असणे आवश्यक आहे हाच उद्देश समोर ठेवला. त्यात डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य येथे अभ्यासने हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

डॉ. पंजाबराव देशमुखांना भाऊसाहेब या नावाने ओळखले जातात. त्यांचा जन्म एका शेतकरी कुटूंबात झाला. त्यांनी लहानपणा पासून शेतकऱ्यांचे जीवन व तत्कालीन गावची स्थिती जवळून पाहीली व अनूभवली होती. त्यांच्या गावात चौथा वर्ग नसल्याने त्यांना स्वतः दोन वर्ष तिसऱ्या वर्गात राहावे लागले होते.[३] त्यानंतर त्यांची दुसऱ्या वर्षी चादूररेल्वे येथे शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. पण त्यांच्या सोबत शिकत असलेला, त्यांचा महार जातीतील लोभ्या नावाचा वर्ग मित्र आपली आर्थिक परिस्थीती नसल्याने पुढे दुसऱ्या गावाला जावू शकला नाही.[४] त्याच वेळी त्यांनी आपल्या आई जवळ बोलतांना म्हटले होते.'आई लोभ्या हा आपल्या गावात शाळा नसल्यामुळे शिकू शकला नाही. म्हणून आपण आपल्या गावातच शाळा सुरू करू.' या वरून डॉ. पंजाबरावांमध्ये लहानपणा पासुनच सामान्य जनते विषयी असलेली आस्था व शिक्षणाविषयी असलेली आवड दिसुन येते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक व धार्मिक प्रबोधन काळात शिक्षणावर देण्यात आला. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात महाराष्ट्रात ००.००००१ इतकेही साक्षरतेचे प्रमाण नव्हते. बहूजन समाजातील हे भिषण स्वरूप पाहून कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. १९०७ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेची स्थापना केली. त्यांनी बहूजन समाजात शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूरात मराठा, लिंगायत, पांचाळ, जैन, मुसलमान, शिंपी, वैश्य, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देऊन त्याना शिक्षण घेण्यास महाराजांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.[४] इं.स. १९१७ मध्ये 'खामगाव येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद झाली.'[५] राजर्षी शाहू महाराज या परिषदेचे अध्यक्ष होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, ' कोणताही देश किंवा समाज शिक्षणा शिवाय विकशीत झाला नाही.म्हणून शिक्षण मोफत व सक्तीचे केले पाहीजे. आपल्यास व आपल्या देशास पुढे आणायचे असेल तर आपल्याला उघोगधंदे शिकले पाहिजे.'[६] या त्यांच्या भाषणाचा परिणाम बहूजन मराठा समाजावर झाला आणि त्यातुन बहूजन समाजाच्या विद्यार्थ्यां मध्ये उच्च शिक्षण घेण्याची उर्मी निर्माण झाली. 'डॉ. पंजाबराव देशमुखही या अधिवेशनात होते.

[७९] 'शहू छत्रपतींच्या विचारांनीभरावून गेले.शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे. या त्यांच्या विचारातून प्ररणा घेतली.'[८०] विदर्भात त्यावेळी मराठा समाजाने चालवेलेली एकही शाळा नव्हती. त्याचा चांगलाच परिणाम झाला. शामराव बापुंनी पंजाबरावांना पुढे शिकविण्यावे ठरवले. शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर खोलवर निर्माण झाला. आपल्या देशातील अज्ञाना मुळे आपला देश विकास साधू शकत नाही, हे डॉ. पंजाबरावांना विदेशात असतांनाच जानवले होते. त्यामुळे त्यांनी विदेशातील सुक्ष्म निरीक्षणातून बऱ्याच गोष्टी भारतात आणण्याचा प्रयत्न केला. हे करीत असतांना अशिक्षित, शेतकरी, कामगार वर्ग त्यांच्या डोळासमोर होता.स्वतःच्या अनुभवातुन त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती जाणली होती. बहूजन समाजाची शैक्षणिक प्रगती आणि शेतकऱ्याची उन्नती ही दोन उद्दीष्टे त्योच्या जिवन कार्याचा आत्मा बनली होती.[८१] शिक्षणातील क्रांती डॉ. पंजाबरावांच्या विशाल स्वप्नाचा प्राथमिक भाग होता. श्रमजिवी समाजाच्या शिक्षणा शिवाय समाज परिर्वनाची प्रक्रिया वेग धारण करू शकत नाही. सार्वत्रिक शिक्षण समाज परिर्वतनाची प्रार्थमिक अट आहे. याची पुर्ण जाणीव डॉ. पंजाबराव देशमुखांना होती.[९०]

डॉ. पंजाबरावा देशमुख इ.स. १९२६ मध्ये विदेशातील शिक्षण पुर्ण करून भारतात परत आले. त्यांनी अमरावतीला आपला वकीलीचा व्यावसाय सुरू केला. पण त्यांच्या मध्ये असलेली समाजा साठी काहीतरी करण्याची जी इच्छा होती. ती त्यांनी स्वस्त बसू देत नव्हती. म्हणून ते कोर्टात वकीली करीत असतांनाच समाजासाठी काहीतरी केले पाहीजे या विषयी विचार करीत होते. या कलखंडात सामान्य माणसाची स्थिती अतिशय दैनिय होती. याला मुख्यता अज्ञान कार्नीभूत होते. त्यामुळे वाईट सवळी, चालीरीती यांच्या आहारी समाज गेला होता. कोणत्याही समाजाची अवस्था तो पर्यंत बदलत नाही, जो पर्यंत तो समाज आपली मनोवृती बदलत नाही. शिक्षणने समाजाची बुध्दी प्रज्वलीत केल्या शिवाय या समाजात चैतन्य निर्माण होणार नाही हे भाऊसाहेबांनी ओळखले होते. विद्या या संजीवनीने मृतप्राय ग्रामीण समाजात नवजीवन संचारेल या भावनेतून त्यानी शिक्षण या मुलभुत प्रश्नाला हात घातला. सामान्य माणसाच्या सर्वांगीन उन्नतीची गुरूकिल्ली म्हणजे शिक्षण असा त्यांचा ठाम विश्वास व सिध्दांत होता. म्हणून त्यांनी अमरावती येथे सुरू असलेल्या शिवाजी मराठा हायस्कुल मध्ये विनामुल्य शिकविण्याचे कार्य सुरू केले. दुपारी कोर्टातून परत येतांना भाऊसाहेब घरी न जाता तेथे शिकविण्याचे कार्य करू लागले. 'आधी केले मग सांगीतले.' हे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या जिवनाचे सुत्र होते. त्यानुसार आपल्या शैक्षणिक कार्याची सुरवात त्यानी शिवाजी मराठा हायस्कुल मधील ज्ञानदाना पासून केली.

इ.स. १९२७ मध्ये अमरावतीचे बॅ. रामराव देशमुखांची मध्यप्रांत वऱ्हाडच्या मंत्रीमंडळात वर्णी लागली. त्यामुळे अमरावती जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्षपदाची जागा रिकामी झाली. तेव्हा डॉ. पंजाबराव देशमुख जिल्हा कौन्सिलच्या निवडणूक रिंगणात उतरले. आगष्ट १९२८ मध्ये अमरावती जिल्हा कौन्सिलची निवडणूक पार पडली.या निवडणूकीत डॉ. पंजाबराव अवघ्या चार मताच्या आघाडीने अध्यक्षपदाच्या जागेवर विजयी झाले.[९१]

डॉ. पंजाबरावा देशमुख जिल्हा कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवडून आल्या नंतर अनेक लोककल्यानाची कार्य केलीत. त्यात शिक्षणा संदर्भातील योजणा फार महत्वाची होती. सक्तीचे प्रार्थमिक शिक्षण त्या काळातील सर्वात मोठी गरज होती. सामाजिक स्थित्यांतरासाठी ही मागणी राजकीय वातावरणात होत होती. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सर्व प्रजाजनांना लिहता वाचता यावे म्हणून २१ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा खास जाहीरणामा काढून प्रसिध्द केला होता. या कायदयाने शिक्षणासाठी योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आई–बापावर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठविली नाहीतर त्यांना प्रत्येकी एक रूपया दर महीणा दंड करण्याची तरतुद करण्यात होती.[९२]डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आपल्या जिल्हातही प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार पुढे ठेवला.अमरावती जिल्हासारख्या अवाढव्य विस्तारात सक्तीचे प्रार्थमिक शिक्षण सुरू करणे जिल्हा कौन्सिलसाठी सोपे काम नव्हते त्याकरीता जिल्हा कौन्सिल वरील खर्चाचा बोझा वाढणार होता. या वाढत्या खर्चातुन समाधानकारक मार्ग काढण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांनी त्यावेळी मिळत असलेली ७० हजार रूपयाची ग्रॅन्ड एक लक्ष रूपये वाढविण्याची सरकारकडे मागणी केली. पण तीचा काही उपयोग झाला नाही.[९३] सरकारने वाढत्या खर्चाच्या प्रमाणात ग्रॉन्ड वाढवली तर नाहीच परंतु मिळत असलेल्या ग्रॉन्ड मध्ये शेकडा २० टक्के प्रमाणे काटकसरीची कात्री लावली. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा कौन्सिलचे उत्पन्न वाढवायचे तर कर आकारणीत वाढ करणे हा एकच मार्ग होता. त्या वेळी कुठल्याही जिल्हा कौन्सिलचा सेस २१ पैसेहून अधिक नव्हता. त्यावेळी अमरावती जिल्हा कौन्सिलचा सेस १८ पैसे हून २७ पैसे वर नेण्याचा डॉ. पंजाबराव देशमुखांनी निर्णय घेतला. त्यामुळे करदात्यां मध्ये कमालीची नाराजी निर्माण झाली. ही करवाढ शक्य नाही असे भाऊसाहेबांचे मित्रही म्हणू लागले. पण भाऊसाहेब आपल्या ठरावावर ठाम होते. त्यांनी पुढे पाऊल टाकल्यावर मागे कधीच घेतले नाही. त्यांनी आपल्या प्रभावी व मुद्देसूद भाषणाने सक्तीची शिक्षण योजना राबवायचीच व त्यासाठी सेस ९ पैसेनी वाढवायचा असा ठराव अविरोध मंजूर करून घेतला. परंतु या ठरावाला मंजूरी देत असतांना विरोधी सदस्यांनी अशी अट घातली की यावर लोक मत अजमावावे व मगच करवाठ करण्याचा अंमीम निर्णय घ्यावा. डॉ. पंजाबराव देशमुखांनी ही अट मान्या केली, व लगेच त्यांनी कर वाठीचा ठराव व आपली भुमीका मांडणारे पत्रक काढून प्रसिध्द केले. विरोधी सदस्यांनी या ठरावाला कडाडून विरोध केला. डॉ. पंजाबराव देशमुखांनी विरोधकांचे आव्हाण स्विकारून ठराव मतांसाठी टाकला. त्यात त्यांना विजय मिळाला. सेस वाढीतून ५५ हजार रूपये मिळाले. त्यातून जिल्हाभर १०० शिक्षणाची केंदे उघडण्यात आली. ११ वर्षा खालील सर्व मुला मुलींना शिक्षण सक्तीचे झाले. आपल्या पाल्यांना न शिकवणाऱ्या पालकांना दंड व शिक्षा करण्यात आली. शिकणाऱ्या मुलांना साहय देण्याची सोय करण्यात आली. त्यामुळे गरीब दुबळांची मुले शाळेत टाकल्या गेली. शेकडो खेडया मध्ये नव्या शाळा उघडल्या गेल्या.[९४] हे पाहून शाहणी माणसे म्हणू लागली 'बॅरिष्टर पंजाबरावान केल तेच बरोबर होते राजे हो' भाऊसाहेबांच्या दुरदर्शी धोरणाचाच हा परिणाम आहे. जनतेच्या उध्दारासाची खरी तळमळ असेल तर राज्यकर्त्याला पैसा कमी पडत नाही, हवी फक्त इच्छा शक्तीची जोड. डॉ. पंजाबराव देशमुखांनी आणखी काही महत्वाचे निर्णय घेतले. त्यावेळी अध्यापक वर्गात पुरूष असे. स्त्री शिक्षणाचा म्हणावा तसा प्रसार झाला नव्हता. वेद काळात पुरूषांबरोबर स्त्रिया वेघ अभ्यास करीत होत्या असे वाचन डॉ. पंजाबरावांनी वाचले होते. स्त्री जर शिक्षण कार्यात आल्या तर त्यांच्या कडून शिक्षणाचे कार्य चांगले होईल असे भाऊसाहेबांना वाटत होते. म्हणून त्यांनी अमरावती जिल्हा कौन्सिल तर्फे चालविणाऱ्या शळातून स्त्री शिक्षकांची नियुक्ती करण्याचे धोरण अंगीकारले.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी नंतर मध्यप्रांत वऱ्हाडचे शिक्षण मंत्री झाल्यावर शिक्षणाच्या विकासा साठी भरीव कार्य केले. शेतकरी कुटूंबातील विद्याथ्यांना शिक्षण घेता यावे या साठी ते सतत धडपडत असत. शेतकरी कुटूंबातील विद्याथ्यांना त्यांनी ३४ टक्के फी मध्ये सुट

देण्याचा निर्णय घेतला. डॉ. पंजाबराव देशमुखांना सत्ता मिळाली तरी त्याचा हव्यास ठेवला नाही. राजकारण हे एक समाजकारणाचे साधन आहे हे त्यांनी जानले होते. १९३२ मध्ये शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून सर्व सामाण्य लोकांना प्राथमीक शिक्षणापासून उच्च शिक्षणा पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. भाऊसाहेबांनी मुलभुत शिक्षण, शारीरिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, तांत्रीक शिक्षण, गृह विज्ञान, स्त्रि शिक्षण इ. क्षेत्रात शिक्षणाचा विकासात महत्वाची भुमिका बजावली.

निष्कर्ष :–

आज राज्यकत्यांचे शिक्षणा विषयीच्या धोरणाचा अभ्यास केला तर अतीशय उदासीन दिसून येत आहे. शिक्षणावर दिवसेनदिवस खर्च कसा कमी करता येईल याचाच ते विचार करीत आहे. त्यामुळे आज प्राथमिक शिक्षणाची दैनीय अवस्था होतांना दिसून येत आहे. शिक्षणामुळेच समाजाचा विकास होत असतो. राष्ट्राची प्रगती होत असते. शिक्षण राष्ट्राचे भविष्य घडवित असते. हे आजचे राज्यकर्त विसरत चाले आहे. आज जगात भारता पेक्षा कीतीतरी लहान असलेल्या राष्ट्रांन मध्ये भारता पेक्षा ज्यास्त शिक्षणावर खर्च केला जातो. पण भारतात तो कमी करण्या कडे कल आहे. डॉ. पंजाबराव देशमुखांनी त्याकाकाळात शिक्षणाचे महत्व ओळखून त्यासाठी कठोर निर्णय घेतले. वेळ प्रसंगी आपल्या जवळच्या वेक्ती सोबत मतभेद झाले तरी जनतेच्या हितासाठी त्यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. वरील वर्णनावरून असे दिसते की, जनतेच्या उध्दारासाची खरी तळमळ असेल तर राज्यकर्त्याला पैसा कमी पडत नाही, हवी फक्त इच्छा शक्तीची जोड. ती आजच्या राज्यकर्त्यांमध्ये दिसून येत नाही. हे आजच्या जनतेचे, समाजाचे दुदैव म्हणावे लागंल.

संदर्भ :–

१) देशमुख, अनुप्रिता – शौक्षणीक तथा महीलोन्नती विषयक कार्य, लोक महर्षा भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ , म.रा.सा. आणि सं.मं. मुंबई, १९९९, पृ.क्र.३१

2) Dalaya Chandra K. Sabnish Ravindra S. - Co-opration in Maharastra, Bomby 1973

३) कडवे, प्रा. रघुपाथ – भारत कृषक भुषण : भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख, आ. १९८६ पृ.क्र. १४

४) आठल्ये, वि. भा. – आधुनिक भारताचा इतिहास – अंकुश पब्लिकेशन, पृ. क्र. २१०

५) पवार, जयसिहराव – राजर्षा शाहू स्मारक ग्रंथ, दु. आवृती २००७ पृ. क्र. ३८६
सवरकर सुदाम, सुर्यकर – भाऊसाहेब–डॉ. पंजाबराव देशमुख – जीवन व कार्य पृ.क्र. १०७

६) जगताप, ज. बा. – प्रकाशक– गेली पंचवीस अधिवेशने (पुर्वार्ध) आ. १९४१ पृ. क्र. १२८

७) पवार, जयसिहराव – राजर्षा शाहू स्मारक ग्रंथ, दु. आवृती २००७ पृ. क्र. ५९६

८) पवार, जयसिहराव – राजर्षा शाहू स्मारक ग्रंथ, दु. आवृती २००७ पृ. क्र. १०७५

९) आठल्ये वि. भा. – आधुनिक भारताचा इतिहास – अंकुश पब्लिकेशन, पृ. क्र. २१७

१०) आठल्ये वि. भा. – आधुनिक भारताचा इतिहास – अंकुश पब्लिकेशन, पृ. क्र. २१३

११) मोहीते, विर उत्तमराव – जागतिक कृषीक्रांतीचा विधाता लोक नेता डॉ. पंजाबरावा देशमुख – प्रा. डॉ. सौ. भाग्यरेखा देशमुख, पब्लिशर्स अमरावती १९८३ पृ. क्र.८

१२) पवार, जयसिहराव – राजर्षा शाहू स्मारक ग्रंथ, आवृती २००१ पृ. क्र. १२०

१३) वाळके, अ. तु. (संपा.) : वऱ्हाड शाळा पत्रक, नोव्हेंबर १९३३, वर्ष ५८ अंक ८ पृ. क्र. ८३

१४) सवरकर सुदाम, सुर्यकर – भाऊसाहेब–डॉ. पंजाबराव देशमुख – जीवन व कार्य, पृ.क्र. २१२
कडवे, प्रा. रघुनाथ – भा. कृ. भु. पृ. क्र. ८३